ESTD 1962
"A" GRADE NAAC

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

शिवाजी विद्यापीठातील सर्व शिक्षक व प्रशासकीय सेवक यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, आयकर नियम 1961 मधील कलम 192 प्रमाणे संपूर्ण वर्षामध्ये मिळणा-या वेतन व इतर भत्त्यांची रक्कम करमुक्त मर्यादेहून जास्त असेल तर वेतन आदा करण्या-या अधिका-यावर पगार आदा करताना कपात करण्याची जबाबदारी असते तसेच **वेतन घेणा-या सर्व संबंधितांची स्वत:ची जबाबदारी आहे की आपल्याला मिळणा-या वेतन व इतर भत्याच्या प्रमाणात आयकर कपात झाली आहे हे पहाणे.**

विद्यापीठातील सर्व शिक्षक व प्रशासकीय सेवक यांनी सन 2020-21 या आर्थिक वर्षामधील आपले उत्पन्न व आयकर सवलत मिळणेसाठी गुंतवणूक करणेत आलेली रक्कम या संदर्भातील तपशीलवार माहिती देवून करपात्र उत्पन्न व भरावा लागणारा आयकर/अधिभार याचे स्वनिर्धारण करून त्या बाबतची माहिती पगारपत्रके विभागास सादर करणे आवश्यक आहे तसेच याबाबत यापूर्वी संदर्भ कमांक शिवाजी विद्या/पगारपत्रके/डि.वाय/आयकर 2020-21/529 दिनांक 16 मार्च 2020 रोजीच्या परिपत्रकांन्वये कळविण्यात आले होते.

त्यानुसार विद्यापीठातील सर्व शिक्षक/प्रशासकीय सेवक यांना कळविण्यात येते की, सध्या ज्या ज्या शिक्षक/प्रशासकीय सेवक यांनी आयकर गणना करणेसाठी विहीत नमुन्यामध्ये माहिती पगार पत्रके विभागास सादर केलेली आहे, ती माहिती संगणकीय वेतनप्रणालीत घेतली असून त्यानुसार आयकर कपात होत आहे. याबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Employee Corner येथे Additional Earning & Investment येथे ज्या त्या शिक्षक/प्रशासकीय सेवक यांना त्यांचे वैयक्तिक लॉग इन वर बघता येत असून त्यामध्ये काही दुरूस्ती असल्यास दिनांक 17 फेब्रुवारी, 2021 पर्यंत पगार पत्रके विभागात समक्ष येवून गुंतवणूक कागदपत्रांची पूर्तता करावी अन्यथा **आयकर कमी पडणारी रक्कम आपल्या फेब्रुवारी 2021 च्या वेतनातून कपात केली जाईल व कपात केलेली रक्कम आयकर नियमानुसार शासनास भरणा केली जाईल तसेच सदरची रक्कम कमी जास्त झाल्यास संबंधित शिक्षक/प्रशासकीय अधिकारी व सेवक यांची वैयक्तीक जबाबदारी राहील याची कृपया नोंद घ्यावी.**

वित्त व लेखाधिकारी

शिवाजीविद्या./पगारपत्रके/डि.वाय/आयकर2020-21/00371
दिनांक- 11 फेब्रुवारी, 2021

टिप : सर्व अधिविभागप्रमुख तसेच सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव प्रशासकीय विभागप्रमुख यांनी सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्वांच्या निदर्शनास आणावे.

C:\Users\admin\Desktop\Dhairyasheel\IT REPORT MONTHLY\saving\2020-21\circular.docx